SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
NOTES- 4(TERM-1)
Subject: Marathi

Grade - 3

Prepared by: Anju korde

पाठ क्र. ४ राखी पौर्णिमा

पूर्व उपक्रम – मराठी सणांची नावे सांगा.

शब्दार्थ

१) प्रतिक - संकेत          २) अर्पण करणे - समर्पित करणे

३) समुद्र - सागर          ४) नारळी भात - नारळ, साखर घालून केलेला गोड भात

**प्रश्न. १** पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) राखी पौर्णिमा हा सण कोणत्या महिन्यात येतो ?

उ – राखी पौर्णिमा हा सण श्रावण महिन्यात येतो.

२) या दिवशी बहीण काय करते ?

उ – या दिवशी बहीण भावाच्या हातावर राखी बांधते.

३ ) कोळी बांधव या दिवशी कोणाची पूजा करतात ?

उ – कोळी बांधव या दिवशी समुद्राची पूजा करतात.

४) या सणाला कोणकोणते गोड पदार्थ करतात ?

उ – या सणाला नारळीभात, नारळाच्या करंजी, बर्फी हे गोड पदार्थ करतात.

**प्रश्न. २** पुढील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा.

१) महाराष्ट्रामध्ये हा सण कोणत्या नावाने साजरा करतात ?

उ – नारळी पौर्णिमा

२) कोळी बांधव समुद्राला काय अर्पण करतात ?

उ – नारळ

**प्रश्न. ३** पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

१) आनंद = हर्ष          २) उत्साही = उल्हासी, उत्सुक

**प्रश्न. ४** कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.

(राखी, समुद्राची, नारळी पौर्णिमा, प्रतीक)

१) भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे <u>प्रतीक</u> म्हणजे रक्षाबंधन .

२) बहीण भावाच्या हातावर <u>राखी</u> बांधते.

३)	महाराष्ट्रामध्ये हा सण <u>नारळी पौर्णिमा</u> म्हणून साजरा करतात.

४)	या दिवशी कोळी बांधव <u>समुद्राची</u> पूजा करतात.

उपक्रम - राखी तयार करून वहीत चिटकवा .

Teacher		HOD		Coordinator		Principal